**पंतप्रधानांची जॉर्डनचे राजे अब्दुल्ला द्वितीय यांच्याशी भेट**

15 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री.  नरेंद्र मोदी यांनी आज जॉर्डनचे राजे अब्दुल्ला द्वितीय यांची भेट घेतली. अल हुसेनिया राजवाड्यात आगमन होताच राजे अब्दुल्ला द्वितीय यांनी पंतप्रधानांचे हार्दिक स्वागत केले आणि औपचारिक समारंभात त्यांचा सन्मान केला.

2. दोन्ही नेत्यांमध्ये मर्यादित तसेच शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा झाली. त्यांनी यापूर्वी झालेल्या त्यांच्या भेटी व संवादांबाबत चर्चा केली आणि उभय देशांदरम्यान असलेल्या आपुलकीच्या व ऐतिहासिक संबंधांवर विशेष भर दिला. दोन्ही देश त्यांच्या राजनैतिक संबंधांच्या स्थापनेची 75वर्षे उत्सव साजरा करत असताना ही भेट होत असल्याने ती ऐतिहासिक असल्याचे त्यांनी नमूद केले. भारत–जॉर्डन संबंध अधिक दृढ करण्यासाठी राजांनी दाखविलेल्या कटिबद्धतेबद्दल पंतप्रधानांनी त्यांचे आभार मानले. राजांनी भारताच्या दहशतवादाविरुद्धच्या लढ्याला प्रबल पाठिंबा दिला आणि दहशतवादाच्या सर्व स्वरूपांचा कडक निषेध केला. दहशतवाद, अतिरेकी प्रवृत्ती व मूलतत्त्ववाद यांना रोखण्यासाठी तसेच या दुष्ट प्रवृत्तींविरोधातील जागतिक लढ्यात योगदान देण्यासाठी राजांनी केलेल्या नेतृत्वाचे पंतप्रधानांनी कौतुक केले. व्यापार व गुंतवणूक; संरक्षण व सुरक्षा; नवीकरणीय ऊर्जा; खत व शेती; नवोपक्रम, माहिती तंत्रज्ञान व डिजिटल तंत्रज्ञान; महत्त्वपूर्ण खनिजे; पायाभूत सुविधा; आरोग्य व फार्मा, शिक्षण व क्षमता विकास; पर्यटन व वारसा; तसेच सांस्कृतिक व लोक संबंध या क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याच्या मार्गांवर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली. भारत हा जॉर्डनचा 3रा सर्वात मोठा व्यापारी भागीदार असल्याची नोंद घेत, पुढील 5 वर्षांत द्विपक्षीय व्यापार 5 अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवावे, असे पंतप्रधानांनी सुचविले. जॉर्डनच्या डिजिटल पेमेंट सिस्टीम आणि भारताच्या युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) यांच्यात सहकार्य करण्याचेही त्यांनी आवाहन केले. जॉर्डन हा भारतासाठी खतांचा महत्त्वपूर्ण पुरवठादार असून, भारतातील फॉस्फेटिक खतांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी जॉर्डन मध्ये अधिक भरीव गुंतवणुकीच्या संदर्भात उभय बाजूंमधील कंपन्यांमध्ये चर्चा सुरू आहे.

3. प्रादेशिक घडामोडी तसेच इतर जागतिक मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांनी आपापली मते मांडली. प्रदेशात शांतता व स्थैर्य पुनर्स्थापित करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पंतप्रधानांनी या प्रदेशात दीर्घकालीन शांतता साधण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नांना भारताचा दृढ पाठिंबा असल्याचे पुन्हा स्पष्ट केले.

4. या भेटीच्या निमित्ताने, दोन्ही बाजूंनी संस्कृती, नवीकरणीय ऊर्जा, जल व्यवस्थापन, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा तसेच पेट्रा आणि एलोरा यांच्यातील ट्विनिंग व्यवस्था याबाबतच्या सामंजस्य करारांना अंतिम स्वरूप देण्यात आले. सामंजस्य करारांची संपूर्ण यादी येथे पाहता येईल [लिंक]. हे करार भारत–जॉर्डन द्विपक्षीय संबंधांना आणि मैत्रीपूर्ण सहकार्याला महत्त्वपूर्ण चालना देतील. चर्चेनंतर

राजे अब्दुल्ला द्वितीय यांनी पंतप्रधानांच्या सन्मानार्थ राजभोजनाचे आयोजन केले होते. पंतप्रधानांनी राजांना भारतभेटीचे आमंत्रण दिले, जे त्यांनी स्वीकारले.

अम्मान

15 डिसेंबर 2025